❍ दि. ६ जानेवारी २०२६
❍ मंगळवार
❍ वर्ष ४ थे
❍ अंक ७०
❍ किंमत २ रूपये
❍ पृष्ठे ४
❍ लातूर
❍RNINO.MHMAR/25/A1409

दैनिक
# अदिती एक्सप्रेस

संपादक - गंगाधर अभंग डिगोळे उपसंपादक : डॉ. ज्ञानेश्वर विठ्ठल कल्याणे

ईमेल-aditiexpress33@gmail.com, **Website: www.aditiexpress.in**

### आजचे पंचाग

❍दिनांक : ६ जानेवारी २०२६
❍वार : मंगळवार
❍माह (अमावस्यांत) : पौष
❍माह (पूर्णिमांत) : पौष
❍ऋतु : शिशिर
❍आयन : उत्तरायण
❍पक्ष : शुक्ल पक्ष
❍तिथी : पौर्णिमा तिथी (दुपारी ०३:३२ पर्यंत) त्यानंतर प्रथम तिथी
❍नक्षत्र : आर्द्रा नक्षत्र (सायंकाळी ०५:२७ पर्यंत) त्यानंतर पुनर्वसू नक्षत्र
❍योग : ब्रह्म योग (सकाळी ०९:०४ पर्यंत) त्यानंतर इन्द्र योग
❍करण : भाव करण (दुपारी ०३:३२ पर्यंत) त्यानंतर बलवा करण
❍चंद्र राशी : मिथुन राशी
❍सूर्य राशी : धनु राशी
❍अशुभ मुहूर्त:
❍राहु काळ : सकाळी ०९:५८ ते सकाळी ११:२१ पर्यंत
❍शुभ मुहूर्त:
❍अभिजित : दुपारी १२:२१ ते दुपारी ०१:०५
❍सूर्योदय : सकाळी ०७:१४
❍सूर्यास्त : सायंकाळी ०६:१२
❍संवत्सर : विश्वावसु
❍संवत्सर(उत्तर) : सिद्धार्थी
❍विक्रम संवत: २०८२ विक्रम संवत
❍शक संवत: १९४७ शक संवत

## एक लाख 'ड्रोन वॉरियर्स'सह 'भैरव स्पेशल फोर्स' सज्ज



नवी दिल्ली : आधुनिक युद्धशास्त्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढवत भारतीय लष्कराने एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. शत्रूच्या घरात शिरून ड्रोनच्या सहाय्याने अचूक मारा करण्यासाठी लष्कराने अधिकृतपणे 'भैरव स्पेशल फोर्स' या नवीन युनिटची घोषणा केली आहे. या विशेष दलात तब्बल १ लाखाहून अधिक ड्रोन ऑपरेटरचा समावेश असून, आधुनिक युद्धाचे स्वरूप बदलण्याची क्षमता या दलात आहे.

पारंपरिक पायदळ आणि निमलष्करी दलांच्या पलीकडे जाऊन तंत्रज्ञानावर आधारित युद्ध लढण्यासाठी या दलाची निर्मिती करण्यात आली आहे. या दलातील १ लाख सैनिक हे केवळ लष्करी प्रशिक्षणातच नाही, तर 'ड्रोन पायलटिंग', 'प्रिसिजन टार्गेटिंग' आणि 'डिजिटल सर्व्हिलन्स'मध्ये निष्णात आहेत. सध्या १५ 'भैरव बटालियन' कार्यान्वित झाल्या असून, लवकरच ही संख्या २५ पर्यंत नेली जाणार आहे. हे दल 'पॅरा स्पेशल फोर्सेस'च्या तोडीचे काम करेल, मात्र त्यांचा मुख्य भर मानवरहित यंत्रणा आणि हाय-स्पीड स्ट्राइकवर असेल.

नुकत्याच पार पडलेल्या 'अखंड प्रहार' या मोठ्या युद्धसरावात भैरव स्पेशल फोर्सने आपली ताकद सिद्ध केली आहे. दक्षिण लष्करी कमांडचे प्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांच्या मार्गदर्शनाखाली या दलाने वाळवंटी आणि दुर्गम भागात ड्रोनच्या सहाय्याने यशस्वी मोहिमा राबवल्या.

येत्या १५ जानेवारी २०२६ रोजी जयपूर येथे होणाऱ्या लष्करी दिनाच्या संचलनात 'भैरव स्पेशल फोर्स' जगासमोर आपले पहिले अधिकृत दर्शन घडवणार आहे. विशेषतः नसीराबाद येथील '२ भैरव' (डेझर्ट फाल्कन्स) ही तुकडी या संचलनाचे मुख्य आकर्षण असेल. (पान २ वर)

## गरजू रुग्णांना उपचार नाकारल्यास कारवाई

मुंबई :राज्यातील प्रत्येक गरजू रुग्णाला सरकारी आरोग्य योजनेअंतर्गत मोफत, दर्जेदार आणि त्रासमुक्त उपचार मिळणे हा त्यांचा हक्क आहे. यामध्ये कोणतीही हलगर्जी खपवून घेतली जाणार नाही. तसेच रुग्णांवर उपचार करण्यास नकार दिल्यास कारवाई करण्यात येईल असे स्पष्ट निर्देश राज्याचे आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले आहेत. 'प्रधानमंत्री जन आरोग्य योजना' आणि 'महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने'शी संबंधित कोणत्याही खाजगी किंवा सरकारी रुग्णालयाने कोणत्याही तांत्रिक कारणास्तव रुग्णाला उपचार नाकारू नयेत, असे आदेश त्यांनी दिले.

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाद्वारे आयोजित एका विशेष आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचे मुख्य (पान २ वर)

## बेस्ट सेवानिवृत्त कामगार अधिकाऱ्यांचे बुधवारी आझाद मैदानात आंदोलन




मुंबई : मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम अर्थात बेस्टच्या सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या न्याय्य मागण्यांसाठी मंगळवार, ७ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० पासून आझाद मैदान येथे चड्डी बनियान आंदोलन पुकारले आहे, अशी माहिती सेवानिवृत्त बेस्ट अधिकारी कर्मचारी संघर्ष समितीचे नेते भाई पानवडीकर यांनी दिली. ऑगस्ट २०२२ पासून कामगार अधिकाऱ्यांची हक्काची देणी ग्रॅच्युइटी व अंतिम देयके अजून दिलेली नाहीत. १०० ते १५० कामगारांनी आपली इहलोकीची यात्रा संपवली. त्यांची ही देणी अद्याप त्यांच्या वारसांना मिळालेली नाहीत. तर काही कर्मचारी भिकेला लागले आहेत. अशी बिकट अवस्था बेस्टच्या सेवा निवृत्त कामगारांची झालेली आहे. पंतप्रधान, मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, सर्व लोकप्रतिनिधी या सर्वांना लेखी निवेदने आणि पत्र दिलेली आहेत परंतु सरकार अद्याप यात बिल्कूल लक्ष घालत नाही. आम्ही गेली ३० ते ३५ वर्षे या मुंबईच्या जनतेची अहोरात्र सेवा केली आहे.

२००५ मधील अतिवृष्टी, २०२० मध्ये करोना काळ, मुंबईत १९९३ मध्ये झालेली दंगल अशा अनेक आपत्कालीन वेळी बेस्टचे कामगार, अधिकारी यांनी जीवाची पर्वा न करता जनतेची सेवा केली आणि आज या कामगारांना आपल्या हक्काची देणी मिळण्यासाठी 'चड्डी बनियन मोर्चा आंदोलन' करावे लागत आहे, ही या सरकारला शरमेने मान खाली घालायला लावणारी बाब आहे. हे सर्व ज्येष्ठ कामगार आहेत.

(पान २ वर)

## परळच्या टाटा रुग्णालयाला बॉम्बने उडवून देण्याची धमकी; रुग्णालय परिसर रिकामा




मुंबई : मुंबईतील परळ भागात असलेल्या जगप्रसिद्ध टाटा मेमोरियल कॅन्सर रुग्णालयाला बॉम्बने उडवून देण्याची निनावी धमकी मिळाल्याने आज मोठी खळबळ उडाली आहे. या धमकीनंतर पोलीस प्रशासन आणि रुग्णालय व्यवस्थापन तातडीने सतर्क झाले असून खबरदारीचे उपाय म्हणून रुग्णालय परिसर रिकामा करण्यात आला आहे.

पोलीस आणि श्वानपथकाकडून तपासणी सुरू

धमकीचा फोन किंवा संदेश मिळताच मुंबई पोलिसांनी तातडीने रुग्णालयाकडे धाव घेतली. सध्या घटनास्थळी बॉम्ब शोधक व नाशक पथक दाखल झाले असून, श्वानपथकाच्या मदतीने रुग्णालयाच्या प्रत्येक मजल्याची आणि कोनाकोपऱ्याची कसून तपासणी केली जात आहे. पोलीस उपायुक्तांसह वरिष्ठ अधिकारी परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

रुग्ण आणि नातेवाईकांची धावपळ

टाटा रुग्णालय हे कर्करोगाच्या उपचारासाठी देशातील सर्वात मोठे केंद्र असल्याने तिथे दररोज हजारो रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक उपस्थित असतात. बॉम्बची बातमी पसरताच (पान २ वर)

## राज्यात ढगाळ हवामानाचा मुक्काम

मुंबई : महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून कडाक्याची थंडी पडल्यानंतर आता हवामानात अचानक मोठा बदल झाला आहे. राज्याच्या अनेक भागांत थंडीचा कडाका ओसरला असून ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. या हवामान बदलाचा सर्वाधिक फटका कोकण आणि मध्य महाराष्ट्राला बसला असून, ऐन भरात आलेल्या आंबा आणि काजूच्या हंगामावर संकटाचे सावट निर्माण झाले आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, उत्तर महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भातील किमान तापमानात आज मोठी वाढ नोंदवण्यात आली आहे. कोकण किनारपट्टीसह अनेक जिल्ह्यांमध्ये ढगाळ वातावरण आहे. जरी पावसाची शक्यता कमी असली, तरी हे ढगाळ हवामान पुढील काही दिवस कायम राहण्याचा अंदाज आहे. यामुळे जानेवारीतील गारवा अचानक गायब झाला असून हवेत उकाडा जाणवू लागला आहे.

(पान २ वर)

## आश्रमशाळेतील शिक्षकांनाही टीईटी बंधनकारक




मुंबई : राज्यातील शाळांतील शिक्षकांना टीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक केल्यानंतर आता आश्रमशाळेतील शिक्षकांनाही टीईटी परीक्षा बंधनकारक करण्यात आली आहे. निर्धारित वेळेत टीईटी परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास संबंधित शिक्षकांची सेवा समाप्त केली जाणार असून, याबाबतचा शासन निर्णय आदिवासी विभागाने जारी केला आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ आणि राष्ट्रीय शिक्षण परिषदेच्या निर्णयानुसार प्राथमिक शिक्षकांकरिता किमान शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता निश्चित करण्यात आली आहे. यामध्ये शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा बंधनकारक करण्यात आली आहे.

२०१३ पासून याची अंमलबजावणी केली जात आहे. २०१३ पासूनच राज्यातील आश्रमशाळांना टीईटी लागू करणे आवश्यक होते; परंतु, टीईटी आश्रमशाळांतील शिक्षकांना लागू करण्यात आली नव्हती. आता मात्र राज्यातील पहिली ते आठवीपर्यंतच्या प्राथमिक आश्रमशाळा व माध्यमिक आश्रमशाळांना परीक्षा लागू करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाने १ सप्टेंबर २०२५ रोजी दिलेल्या निकालात स्पष्ट निर्देश देत, आरटीई कायदा लागू होण्यापूर्वी नियुक्त झालेले आणि सेवानिवृत्तीस पाच वर्षांपेक्षा अधिक कालावधी शिल्लक असलेले (पान २ वर)

## किल्लारीच्या निळकंठेश्वर साखर कारखान्याची भरारी; ४४ दिवसांत १ लाख मेट्रिक टन ऊस गाळप पूर्ण

**दै. अदिती एक्सप्रेस**



औसा : आमदार अभिमन्यू पवार यांच्या पुढाकारातून व सातत्यपूर्ण प्रयत्नातून सुरू झालेल्या किल्लारी येथील श्री निळकंठेश्वर सहकारी साखर कारखान्याने अवघ्या ४४ दिवसांत १ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. अनेक आर्थिक, तांत्रिक व प्रशासकीय अडचणींवर मात करत कारखान्याने साधलेली ही कामगिरी सहकार क्षेत्रासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.

एकेकाळी मृतावस्थेत गेलेला व अनेक वर्षे बंद असलेला हा कारखाना सहकाराच्या माध्यमातून पुन्हा नव्या जोमाने कार्यान्वित झाला आहे. 'श्री निळकंठेश्वराचे आशीर्वाद आणि शेतकऱ्यांचा विश्वास' या बळावर कारखान्याने १ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला असून सध्या कारखाना पूर्ण क्षमतेने सुरू आहे. या यशाबद्दल कारखान्यावर अहोरात्र कार्यरत असलेले सर्व अधिकारी, कर्मचारी, सहकारी व सभासद ऊस उत्पादक शेतकरी बांधवांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे.यंदाच्या गळीत हंगामात कारखान्याने ३ लाख ते ३ लाख ५० हजार मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवून काम सुरू ठेवले आहे. कारखान्याच्या दैनंदिन साखर उताऱ्याने १२.०५ टक्क्यांपर्यंत मजल मारली असून सरासरी साखर उतारा १०.७५ टक्के इतका समाधानकारक आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कारखान्याच्या यशस्वी कामगिरीत नवीन 'नॅचरल शुगर' बी. बी. ठोंबरे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. तसेच वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटने तांत्रिक सल्लागार म्हणून बजावलेली भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. कारखान्यातील संपूर्ण मशिनरीचे नूतनीकरण करण्यात आल्याने कारखाना सध्या सुस्थितीत व कार्यक्षमतेने सुरू आहे. आमदार अभिमन्यू पवार यांनी हा कारखाना पुन्हा सुरू करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करून आवश्यक मदत मिळवून दिली. त्या मदतीच्या आधारे कारखान्याचे पुनर्जीवन करण्यात आले. गेल्या अनेक वर्षांपासून बंद असलेला हा कारखाना सहकारात पुन्हा सुरू झाल्याने लातूर व धाराशिव जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी ही मोठी दिलासादायक व आनंदाची बातमी ठरली आहे. किल्लारीच्या निळकंठेश्वर साखर (पान २ वर)

## स्थानिक स्वराज्य संस्थेत प्रशासक म्हणजे संविधानाचा अवमान-सुजात आंबेडकर

**दै. अदिती एक्सप्रेस**



लातूर- लातूर शहर महानगरपालिका निवडणूक अनुषंगाने या निवडणुकितील राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व वंचित बहुजन आघाडीचे प्रभाग २, प्रभाग ३, प्रभाग ४, प्रभाग ५ आणि प्रभाग ७ मधील उमेदवारांच्या प्रचारार्थ लातूर शहरातील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी एकत्रित जाहीर प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते.

दरम्यान माजी मंत्री आमदार अमित देशमुख, वंचितचे युवा नेते सुजात आंबेडकर खा. डॉ. शिवाजी काळगे आणि सर्व मान्यवरांकडून परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले तसेच परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वंशज असणारे युवा नेते सुजात आंबेडकर यांना प्रथेनुसार समता सेनेच्या वतीने सलामी देण्यात आली.

यावेळी बोलताना युवा नेते सुजात आंबेडकर म्हणाले की, सण २०१६-१७पासून लातुर मनपा मध्ये आपण जो होत असलेला भ्रष्टाचार पाहतो आहे. या भ्रष्टाचाराचे समूळ उच्चाटन (पान २ वर)

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला महानगरपालिकेची सत्ता द्या: पारदर्शकपणे कारभार करून दाखवणार सहकार मंत्री ना. पाटील



**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर- शहर महानगरपालिकेची सत्ता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ताब्यात द्या, मनपाचा पारदर्शक कारभार सर्व नगरसेवक करून दाखवतील असा विश्वास राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी लातूर येथील सिद्धेश्वर मंदिरात केले.

लातूर येथील सिद्धेश्वर मंदिरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व उमेदवारांचा एकत्रितपणे प्रचाराचा शुभारंभ राज्याचे सहकार मंत्री ना . बाबासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आला यावेळी ते बोलत होते.

व्यासपीठावर माजी मंत्री संजय बनसोडे, शिक्षक आमदार विक्रम काळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अफसर शेख,विक्रम गोजमगुंडे , वेंकटराव बेंद्रे,बबन भोसले, मकरंद सावे, प्रशांत पाटील, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, माजी उपमहापौर चंद्रकांत बिराजदार, बळवंत जाधव, सुरेखा पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व उमेदवार पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना सहकार मंत्री नामदार पाटील म्हणाले की, लातूर महानगरपालिकेची निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पूर्ण ताकदीने लढत असून सिद्धेश्वराचा आशीर्वाद सुद्धा आपल्या पक्षाला मिळेल. त्याचबरोबर राष्ट्रवादी पक्षाने जनतेतले उमेदवार दिले असून आपण ही निवडणूक विकासावर लढवत (पान २ वर)

## भाजपाचा विकास अजेंडाविरुद्ध काँग्रेसची जुनी घोषणाबाजी

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ७ जानेवारी रोजी प्रचारसभा

**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर / प्रतिनिधी- लातूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले असून भाजपाने विकास हा मुख्य अजेंडा ठरवत प्रचाराची जोरदार तयारी सुरू केली आहे. राज्यातील प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत सभा व बैठकींचे आयोजन करण्यात आले असून भाजपाचे पदाधिकारी आत्मविश्वासाने मैदानात उतरले आहेत.

दुसरीकडे काँग्रेसकडून जुन्या घोषणांची पुनरावृत्ती होत असल्याचा आरोप भाजपाने करत, लातूरकरांसमोर ठोस विकासकामे मांडण्याचे आव्हान विरोधकांना दिले आहे.



लातूर शहर महानगरपालिका निवडणूक प्रमुख आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनीही विरोधकांवर जोरदार टीका केली. काँग्रेस ही निवडणूक विकास सोडून दुसऱ्या बाजूने नेत आहे. अमित देशमुख यांनी १५ वर्षांत लातूरकरांसाठी कोणता विकास अजेंडा राबवला हे सांगावे. आदरणीय विलासराव देशमुख यांच्या पुण्याईवर किती दिवस निवडणुका लढवणार? त्यांना अभिप्रेत असलेली कामे झाली नाहीत, म्हणूनच विकासाबाबत ते बोलू शकत नाहीत. ही निवडणूक लातूर विरुद्ध निलंगा नव्हे, शहरातील कचरा, स्वच्छ पाणी, वाहतूक, आरोग्य सुविधा यावर काँग्रेसने काय केले हे सांगावे, असे निलंगेकर म्हणाले.

भाजप विकासावर निवडणूक लढवणार असून लातूरकरांच्या प्रश्नांवर काय करणार याचा जाहीरनामा लवकरच प्रसिद्ध होईल. कचरा आणि पाण्याचा प्रश्न सोडवला नाही तर पुढील विधानसभा निवडणुकीत लातूरकरांसमोर येणार नाही, ही स्टेटमेंट रेकॉर्ड करून घ्या, असे आव्हान त्यांनी दिले. कमळाला मत म्हणजे विकासाला मत हे जनतेला समजले असून भाजपला मोठा पाठिंबा मिळत आहे. येत्या निवडणुकीत ५० पेक्षा अधिक जागा भाजप जिंकेल, असा विश्वास निलंगेकर यांनी व्यक्त केला. (पान २ वर)

# निर्दयी व्यवस्थेचे बळी

भारतातील शहरात कोणतीही व्यवस्था नाही. इंदूर जे सलग आठ वर्षे स्वच्छ शहर म्हणून जगभरात परिचित होते, त्या शहरात गंभीर जनआरोग्य संकट निर्माण व्हावे आणि त्यात १५ जणांचा बळी जावा ही निश्चितच गौरवास्पद बाब नाही. उलट इंदूर स्वच्छ शहराच्या नावलौकिकाला काळिमा फासणार आहे.

स्वच्छ पेयजलाची समस्या खरेतर सन २०२६ मध्ये कुणालाही लांच्छनास्पद वाटावी. त्यातही इंदूरसारख्या स्वच्छ म्हणून गणल्या गेलेल्या शहरात तर ती जास्तच क्लेशदायक आहे. पण भारतात हे घडले आणि १५ नागरिकांचा बळी गेला. त्यामुळे जलसंकटाचे रूपांतर एका राष्ट्रीय आक्रोशात झाले. दूषित पेयजलाचा प्रकार घडला तो इंदूरच्या दाट आणि कमी उत्पन्न असलेल्या वस्तीत. १५ लोकांच्या मृत्यूने संपूर्ण देश हादरला. त्यापेक्षाही शासन व्यवस्थेवर अनेक प्रश्न उपस्थित झाले. नेहमीप्रमाणे प्रशासन मृतांची आकडेवारी लपवण्यात मग्न आहे. नेमके किती लोकांना यात आपले प्राण गमवावे लागले याची माहिती कुणीही अधिकृत देत नाही. पण शहरी स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनाबाबतीत आदर्श म्हणून सादर करण्यात येणारे मध्य प्रदेशातील इंदूर शहर हे सध्या भयावह जलसंकटाचे प्रतीक बनले. आंतरराष्ट्रीय स्तरावर या घटनेचे तीव्र पडसाद उमटणे साहजिक आहे. कारण ज्या शहराला त्याच्या स्वच्छतेबाबत नेहमीच वाखाणले जाते आणि ज्या शहराची उदाहरणे दिली जातात त्याच्या नगरपालिकेकडून अशी अक्षम्य चूक कशी होऊ शकते असा प्रश्न विचारला जात आहे. इंदूरची समस्या स्थानिक लोकांसाठी चिंतेचा विषय तर आहेच पण जागतिक स्तरावर निर्भत्सनेचा विषय बनला आहे. येथील लोकांनी अनेकदा तक्रारी करूनही प्रशासनाने लोकांच्या तक्रारींकडे लक्षच दिले नाही. ही बाब त्यातल्या त्यात जास्त चिंताजनक आहे.

अनेक महिने लोक दुर्गंधीयुक्त पाण्याबाबत तक्रारी करत होते पण त्यांच्या तक्रारी आणि आवाज फायलींमध्ये दबलेले राहिले. नोकरशाहीच्या किचकट प्रक्रिया आणि प्रशासनाची उदासीनता यामुळे यासंदर्भात काहीच कारवाई झाली नाही. प्राथमिक चौकशीत असे समोर आले आहे, की पेयजल जलवाहिनीच्या वर एक शौचालय बांधलेले होते आणि त्यातून एक स्युएज पाण्याचा प्रवाह जलपूर्तीच्या प्रवाहात मिसळला गेला आणि त्यातही गंभीर बाब अशी की हे शौचालय कोणत्याही सेप्टिक टॅकविनाच बांधले गेले होते. यामुळे अनेक गंभीर प्रश्न निर्माण होतात. नगर नियोजन आणि देखभाल आणि जबाबदारी निश्चित करण्याबाबत अनेक गंभीर सवाल उपस्थित झालेत. या पाण्याच्या नमुन्यात काही बॅक्टेरिया आढळले आहेत, जे हानिकारक आहेत.

आता राजकारण यावर सुरू झाले नसते तरच नवल. कारण राहुल गांधी यांनी भाजपशासित राज्य सरकारवर अत्यंत बेपर्वाईचा आरोप केला आणि त्यांनी म्हटले आहे, की हे पाणी नाही तर विष होते. पण राहुल यांच्या काँग्रेसच्या काळात कितीतरी घटनांत सरकारी बेपर्वाईमुळे लोकांचे जीव गेले. विरोधी नेता म्हणून राहुल यांना आपले मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे आणि ते आपले विचार मांडण्यास मोकळे आहेत. पण त्यांच्या टीकेला राजकीय वास येतो. मुख्यमंत्री यादव यांनी सांगितले की जल सुरक्षा योजना बनवली जाईल आणि नव्याने नियम बनवले जातील. विषारी वायू जितका घातक असतो तितकेच दूषित पेयजलही जीवघेणे असते हा या घटनेवरून मिळालेला धडा आहे. हा प्रश्न एकट्या इंदूरपुरता मर्यादित नाही, तर कोणत्याही लोकसंख्येच्या शहरासाठी तो तितकाच तीव्र आहे आणि विचार करायला लवणारा आहे.

झपाट्याने वाढणारी लोकसंख्या, अनियमित पाण्याचे परीक्षण, भ्रष्टाचार आणि बुनियादी रचनांजवळ अनियंत्रिक बांधकामे यांना वेळीच रोखले पाहिजे. अन्यथा भविष्यात अशीच संकटे येत राहणार आणि ती इंदूरमध्येच नाही तर कुठेही येतील.पुरस्कार आणि रँकिंग्जना तोपर्यंत अर्थ नाही जोपर्यंत सामान्य माणसाला जीवनाची हमी नाही. त्यासाठी हवी आहे ती मजबूत निगराणी, जबाबदारीची प्रशासनाला जाणीव ही जोपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नाही तोपर्यंत कोणतेही शहर आज सुरक्षित नाही. इंदूरची घटना कशी घडली त्यापेक्षाही महत्त्वाचे हे आहे, की भविष्यात अशी घटना कुठेही घडू नये. इंदूरचे कौतुक एकेकाळी पंतप्रधान नरेंद्र मोदी करत होते आणि ते योग्यही होते. पण त्याच इंदूरमध्ये अशी घटना घडावी हे वाईटच नव्हे, तर विकसित भारताच्या वाटचालीत अशोभनीय आहे. २०४७ मध्ये भारताला विकसित राष्ट्र बनवण्याची योजना मोदी यांची आहे. त्याला इंदूरच्या घटनेने सुरुंग लावला आहे असे म्हणावे लागेल. कचरा व्यवस्थापन याबाबतीत आदर्श म्हणून सादर केले जाणाऱ्या इंदूर शहरात अशी दूषित पाण्याची घटना घडावी आणि त्यात १५ लोक बळी जावेत ही दुर्दैवाची परिसीमा आहे.

आज भारत विकसित देश म्हणून २०४७ मध्ये जाण्याची तयारी करत असताना त्याच्या वाटचालीत या घटना खीळ घालणाऱ्या तर आहेतच पण आपल्याला अजूनही काही काम बाकी आहे हे दर्शवणाऱ्या आहेत. आता राज्य सरकारने महापालिका आयुक्तांना कारणे दाखवा नोटीस जारी केली आहे. पण ही कारवाई पुरेशी नाही. इंदूरचे प्रशासन या गंभीर घटनेपासून काही धडा घेण्याऐवजी केवळ रंगसफेदी करण्यातच धन्यता मानत आहे हे त्यातून स्पष्ट झाले आहे. ज्या भागीरथपुरा या भागात ही दूषित पाण्याची घटना घडली त्यावरून या भागात नागरी सुविधांची वानवा आहे हे सिद्ध झाले आहे. आता हा साराच प्रकार उघडकीला येऊन दोषी व्यक्तींना शिक्षा होईल. पण २०४७ मध्ये विकसित देशांच्या रांगेत जाऊन बसण्याचे जे ध्येय भारताने ठरवले आहे त्यात अशा घटनांनी बाधा येते याकडे संबंधितांनी दुर्लक्ष करू नये. सरकारनी आता ठिकठिकाणी जल जीवनसारखे अभियान सुरू केले आहे. त्यानुसार ८१ टक्के ग्रामीण घरांमध्ये टॅप वॉटर पोहोचवण्याचा सरकारचा दावा आहे. पण यात सुधारणा खूप बाकी आहे आणि आकडेवारीपेक्षा वस्तुस्थिती जास्त बोलकी आहे.

# गुड टच बॅड टच गीत प्रदर्शित




**मनेश पाटील**

उदगीर /प्रतिनिधी- महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी कृष्णा काकरे यांनी दिग्दर्शित केलेले गीत सगळ्यांच्या पसंतीस उतरले आहे.

वर्तमानातील लहान मुलांच्या विश्वात काही नवीन गोष्टी त्यांना शिकवण्यासाठी गीतकार डॉ. भाग्यश्री घाळे यांनी शब्दबद्ध केलेले व दिग्दर्शक कृष्णा काकरे यांनी दिग्दर्शित केलेले ''गुड टच बॅड टच हे गीत नुकतेच प्रदर्शित झाले आहे. अत्यंत सोप्या पद्धतीतून विद्यार्थ्यांना आपल्याला होणाऱ्या स्पर्शाची जाणीव या गीतातून करून देण्यात आली आहे. कोणता स्पर्श चांगला व कोणता स्पर्श वाईट हे गीतातून अधोरेखित केले आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांना या स्पर्शाची जाणीव होऊन त्या पद्धतीने ते कृती करण्यासाठी सक्षम व्हावे यासाठी हे गीत प्रेरणादायी ठरू शकते. आजचे बालविश्व या ना त्या कारणाने कोमेजून जात असताना अशा पद्धतीच्या प्रबोधनात्मक गीतामुळे त्या बाल जीवनात नवी ऊर्जा मिळण्याची प्रेरणा या गीतातून दिल्या गेली आहे. या गीताला सर्वत्र चांगला प्रतिसाद मिळत आहे. हे गीत पाहण्यासाठी डॉ. भाग्यश्री घाळे ह्या युट्युब चॅनेलवर तसेच फेसबुक पेजवर आपण हे गीत पाहू शकता. महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. दीपक चिद्दरवार यांनी या गीताची प्रशंसा केलेली आहे.

# माजी मंत्री तथा आमदार संजय बनसोडे यांची गुजलवार निवासस्थानी सदिच्छा भेट

**मनेश पाटील**

उदगीर /प्रतिनिधी- उदगीर शहराचे क्रांतिसूर्य, विकासपुरुष सर्वांच्या हृदयातील लाडके व्यक्तिमत्व माजी मंत्री तथा आमदार आदरणीय संजयजी बनसोडे यांनी गुजलवार यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली.



उदगीरच्या ऐतिहासिक ,सांस्कृतिक आणि सामाजिक सर्वच क्षेत्रात गौरवाचे स्थान प्राप्त झालेले उदगीरच्या जनमाणसाच्या हृदयातील लाडके व्यक्तिमत्त्व माजी मंत्री तथा आमदार संजयजी बनसोडे यांचा अत्यंत सृजनतेने उदगीरच्या साहित्यिका समाजसेविका सौ. सुरेखा गुजलवार आणि डॉ. उदय गुजलवार ,या परिवाराकडून आदरयुक्त औक्षणसत्कार सोहळा करण्यात आला.

लोकमतचा लंडन येथे झालेला महाराष्ट्ररत्न पुरस्कारा तसेच नववर्षाभिनंदन ,माजी मंत्री तथा आमदार संजयजी बनसोडे यांच्या कार्याप्रती गुजलवार परिवाराने कृतज्ञता व्यक्त केली .

यावेळी ऋषिकेश गुजलवार,वैजनाथ गुजलवार, मातोश्री श्रीमती रुक्मिणी पातावार यांनी,देखील शाल श्रीफळ बुके देवून यथोचित सन्मान केला. यावेळी डॉ संजीवनी भातंब्रे, डॉ बालाजी बिरादार,डॉ पांचाळ ,डॉ सिद्धेश्वर,डॉ सोनाळे डॉ. गजेंद्र राठोड, विशेष कार्य अधिकारी, श्री. सिध्दार्थ सुर्यवंशी, जनसंपर्क अधिकारी श्री. अतुल काकडे, स्वीय सहाय्यक, एडवोकेट श्रीदीप पाटील, स्वीय सहाय्यक, श्री. रियाज फारुखमियाँ देशमुख, अंगरक्षक पत्रकार बिभीषण मद्देवाड ,आदि उपस्थित होते.

# पू. अहिल्यादेवी होळकर उद्यानातील ज्येष्ठ नागरिक संघाच्या विरंगुळा केंद्रातील योग वर्गाचा तिसरा वर्धापन दिन साजरा

**मनेश पाटील**

उदगीर /प्रतिनिधी-

या प्रसंगी ज्येष्ठ नागरिक संघातर्फे योग शिक्षक प्रा. चामले व सौ. जयश्री चामले यांचा संपत्ती सत्कार ज्येष्ठ नागरिक संघातर्फे करण्यात आला. त्याशिवाय आर्य समाजाचे सचिव श्री. शिंदे सर व मधुमती शिंदे सर तसेच नरेंद्रजी येंदे सर यांनी व सर्वच योग साधकाने त्यांचा सत्कार केला.




या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रा. मधवरे सर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सचिव श्री. जाधव मुरलीधर राव व ग्रंथ मित्र श्री दीपक बलसुरकर सर उपस्थित होते.

याप्रसंगी अनेक योगसाधकांनी आपापले अनुभव या ठिकाणी कथन केले कित्येक योगसाधकांची दररोजची मधुमेहाची गोळी बंद झाली होती तर संधिवाताचे दुखणे बऱ्याच योगसाधकांचे कमी झालेले होते.ज्या साधकांना बसता येत नव्हते त्या साधकांना बसता येत आहे या प्रकारचे अनुभव महिला आणि पुरुष योगसाधकांनी या ठिकाणी कथन केले. गेल्या दोन वर्षापासून सातत्याने चालणाऱ्या या योगवर्गातील सर्वच साधकांचे आभार योगशिक्षक प्रा श्रीराम चामले यांनी मानले त्याचबरोबर ज्येष्ठ नागरिक संघाने व पतंजली योग समितीने यांच्या विद्यमाने हा योग वर्ग चालतो म्हणून दोन्ही संघटनांचे आभार त्यानी मानले. आणि हा योग वर्ग एक आदर्श योग वर्ग बणण्यासाठी आणखीन काय काय उपाययोजना करता येतील या बाबतीत आमचे प्रयत्न आहेत हे ही त्यांनी सांगितले.

याप्रसंगी आदर्श शेतकरी श्री गोविंदराव अकणगगिरे ,ज्येष्ठ योग शिक्षक शंकरराव चापूले सर, गोविंदरावजी मेहेत्रे, धोंडीबा बिरादार, सुलोचनाचा बिराजदार, भारतीताई मोरे, मोदीताई, मोदी साहेब, जयश्री चामले, महाजन ताई ,भगवती ताई टवानी, कमलाकरजी कोरेकर कर, शिवकुमार शिरगिरे ,नरेंद्र यंदे श्री स्वामी साहेब , बदनाळे वैजनाथराव , कल्याण रावजी सताळे, भीमाशंकर चवळे, श्रीरामे यादव व अनेक योग साधक कार्यक्रमासाठी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री नळगिरकर सर यांनी केले. तर आभार प्रदर्शनप्रा.महादेव गंदिगुडे सर यांनी केले.

# श्री पांडुरंग विद्यालय, कल्लूर येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी



**मनेश पाटील**

उदगीर /प्रतिनिधी- कल्लूर येथील श्री पांडुरंग विद्यालय येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाचे मुख्याध्यापक नादरगे एस. व्ही. यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात केली.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे केंद्रे डी. पी. व भोळे आर. आर. उपस्थित होते. त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षणकार्य, स्त्रीशिक्षणासाठी केलेले योगदान व सामाजिक सुधारणांवरील कार्य याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या विचारांतून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली.

कार्यक्रमास शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कलाशिक्षक नादरगे चंद्रदीप यांनी सुंदर फलक लेखनातून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना विनम्र अभिवादन करून बालिका दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा दिल्या. सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा आदर्श विद्यार्थ्यांनी अंगीकारावा, असा संदेश यावेळी देण्यात आला.

## पान १ वरून

### एक लाख...

केवळ ड्रोनच नाही, तर भारतीय लष्कराने 'रुद्र ब्रिगेड' (एकात्मिक लढाऊ तुकड्या) आणि 'शक्तिबाण' (प्रगत तोफखाना रेजिमेंट) यांसारखी नवीन युनिट्सही तैनात केली आहेत. सीमावर्ती भागात चीन आणि पाकिस्तानच्या वाढत्या हालचालींना चोख प्रत्युत्तर देण्यासाठी भारताची ही 'सायबर-फिजिकल' युद्धनीती अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

### गरजू रुग्णांना...

कार्यकारी अधिकारी डॉ. अण्णासाहेब चव्हाण, ठाणे जिल्हा परिमंडळाचे उपसंचालक डॉ. अशोक नंदापूरकर आणि विविध रुग्णालयांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मंत्री आबिटकर यांनी बैठकीत स्पष्ट केले की, अनेकदा मूळ रेशन कार्ड नसल्यामुळे किंवा इतर किरकोळ कागदपत्रांच्या अभावामुळे रुग्णालये रुग्णांना दाखल करून घेण्यास टाळाटाळ करतात. मूळ रेशन कार्ड नसेल तर डिजिटल रेशन कार्ड पडताळणीचा वापर करा, पण रुग्णाला उपचारांपासून वंचित ठेवू नका, असे त्यांनी ठणकावून सांगितले.

या निर्णयामुळे राज्यातील लाखो गरीब आणि मध्यमवर्गीय रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असून, रुग्णालयांच्या मनमानी कारभाराला चाप बसणार आहे, असे मंत्री आबिटकर यांनी सांगितले.

### बेस्ट सेवानिवृत्त...

लोक अदालत आणि मा. उच्च न्यायालयाने देखील कामगारांना ताबडतोब देणी देण्यासंबंधी निर्णय दिला आहे. परंतु राज्य शासन आणि मुंबई महापालिका आयुक्त, मनपा कायदा १८८८ मध्ये तरतूद असून देखील जाणूनबुजून दुर्लक्ष करीत आहेत. आम्हाला कोणी न्याय देइल काय ? असा संतप्त सवाल हे सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी करीत आहेत.

### परळच्या टाटा...

परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. सुरक्षेच्या कारणास्तव प्रशासनाने रुग्णांना सुरक्षित स्थळी हलवण्यास सुरुवात केली असून, बाह्यरुग्ण विभाग (OPD) आणि इतर गर्दीच्या जागा रिकाम्या करण्यात आल्या आहेत.

धमकीचा शोध सुरू हा निव्वळ अफवेचा प्रकार आहे की घातपाताचा प्रयत्न, याचा तपास पोलीस करत आहेत. ज्या क्रमांकावरून किंवा माध्यमातून ही धमकी आली, त्याचा तांत्रिक शोध घेतला जात आहे. नागरिकांनी घाबरून जाऊ नये, पोलीस सर्वतोपरी तपास करत आहेत, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### राज्यात ढगाळ...

सिंधुदुर्ग जिल्ह्यात गुरुवार सायंकाळपासून वातावरणात वेगाने बदल झाले आहेत. आधी दाट धुके आणि आता ढगाळ हवामानामुळे आंबा व काजू बागायतदार चिंतेत पडले आहेत. गेल्या ४-५ वर्षांनंतर यंदा नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये चांगली थंडी पडल्याने आंबा आणि काजूला विक्रमी मोहोर आला आहे. किनारपट्टी भागात तर पानांपेक्षा मोहोरच जास्त अशी स्थिती आहे. गेल्या पाच-सहा दिवसांपासून वाढलेले धुके आणि आताचे ढगाळ वातावरण यामुळे 'टी मॉस्किटो' (तुडतुडे) आणि बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पहाटेच्या वेळी झाडांवरून पावसासारखे पाणी पडत असल्याने मोहोराची गळती होण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत.

यंदा चांगल्या थंडीमुळे आंबा, काजूला उत्तम मोहोर आला असून, काही भागांत फळधारणादेखील झाली आहे. दमट वातावरणामुळे किडरोगांचे प्रमाण वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे बागांचे निरीक्षण करून विद्यापीठाने शिफारस केलेल्या कीटकनाशक, बुरशीनाशकांची फवारणी करावी. इतर व्यवस्थापनदेखील कृषी विभागाच्या सल्ल्यानुसार करावे.

### आश्रमशाळेतील...

शिक्षक हे दोन वर्षांच्या आत टीईटी उत्तीर्ण करण्यास अनिवार्य असल्याचे नमूद केले. अन्यथा त्यांना सेवेत राहता येणार नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले होते.

या निकालाच्या आनुषंगाने शासनाने आता आदेश जारी केले असून अनुदानित आश्रमशाळांतील अशा शिक्षकांनी १ सप्टेंबर २०२७ पूर्वी टीईटी उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील. निर्धारित वेळेत टीईटी उत्तीर्ण न झाल्यास संबंधित शिक्षकांची सेवा समाप्त करण्यात येईल. यापुढे आदिवासी विकास विभागाच्या नियंत्रणाखालील अनुदानित आश्रमशाळांमध्ये प्राथमिक शिक्षकांची नियुक्ती करताना फक्त टीईटी उत्तीर्ण उमेदवारांचीच निवड केली जाणार आहे. टीईटी पात्र उमेदवार उपलब्ध नसल्यास, शैक्षणिक सत्र संपेपर्यंत कंत्राटी पद्धतीने शिक्षक नियुक्त करता येणार आहेत. मात्र, अशा कंत्राटी शिक्षकांना कोणतेही शासकीय आर्थिक अथवा सेवाविषयक लाभ मिळणार नाहीत आणि त्यांचा वेतनखर्च संबंधित संस्थांना स्वतः च्या निधीतून करावा लागणार आहे.

या शासन आदेशाची तातडीने आणि काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश आदिवासी विकास विभागाने दिले आहेत. सर्व प्रकल्प अधिकारी, सहायक आयुक्त, अपर आयुक्तांना याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या असून, कोणतीही दिरंगाई किंवा दुर्लक्ष सहन केले जाणार नाही, असेही नमूद करण्यात आले आहे.

### किल्लारीच्या...

कारखान्याने ४४ दिवसांत १ लाख मेट्रिक टन ऊस गाळप पूर्ण करून सहकाराच्या ताकदीचे दर्शन घडविले असून आगामी काळात उद्दिष्टपूर्तीच्या दिशेने कारखाना वेगाने वाटचाल करीत राहील, असा विश्वास शेतकरी व सभासदांकडून व्यक्त होत आहे.

श्री निळकंठेश्वराचे आशीर्वाद आणि शेतकरी बांधवांचा विश्वास याच्या बळावर किल्लारीचा निळकंठेश्वर सहकारी साखर कारखाना पुन्हा उभा राहिला आहे. अवघ्या ४४ दिवसांत १ लाख मेट्रिक टन ऊस गाळप पूर्ण होणे ही सहकाराची ताकद दर्शवते. केंद्रीय मंत्री मा. अमित शहा, मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्र्यांनी कारखाना सुरू करण्यासाठी मोलाची मदत केली, त्यामुळेच हे अशक्य वाटणारे कार्य शक्य झाले. अधिकारी, कर्मचारी व शेतकऱ्यांचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे.

आमदार अभिमन्यू पवार

### स्थानिक स्वराज्य ...

करण्याची वेळ आणि या निवडणुकीच्या माध्यमातून आपल्याला एक संधी आलेली असून या संधीचे सोने आपण करावे. जेव्हा निवडणूक होत नाही, ती डावलली जाते आणि सरकार आपले लोक, पैसे खाणारे भ्रष्ट प्रशासक नेमते हा संविधानाचा अपमान असून या प्रशासक व सरकारचे प्रतिनिधी याना लातुर मनापासून दूर करा आणि आपले स्वच्छ प्रतिमेचे, सर्वसामान्य माणसातील काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवाराना प्रचंड मताधिक्याने निवडुन देऊन लातुर मनपात पाठवा असे आवाहन त्यांनी केले. या जाहीर प्रचार सभेत बोलताना माजी मंत्री आ. अमित देशमुख म्हणाले की, लातुर शहर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक जाहिर झाली असून या निवडणुक प्रचाराचा श्रीफळ आज तुमच्या साक्षीने वाढवला जात आहे. जिवाभावाची माणसे काय असतात याची प्रचिती आपल्याला पाहिल्यानंतर होते असे म्हणत परमपूज्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला जे अधिकार दिले यामुळे आपण लातूरला सुरक्षित ठेवू शकलो याची आठवण करून दिली. यावेळी खा. डॉ. शिवाजी काळगे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, वंचितचे अॅड. संतोष सूर्यवंशी आदिंची भाषणे.

### राष्ट्रवादी काँग्रेस...

असून दर दोन दिवसाला पाणी, स्वच्छता, आरोग्य यावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा भर राहणार आहे. त्याच बरोबर आमचा विचार घेतल्याशिवाय महापालिका चालू शकणार नाही असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आज आम्हाला कुणावर टीका करायची नाही तेवढा वेळही आमच्या पक्षाकडे नसून आम्ही विकास कामावर मतदान मागणार असल्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी केले. यावेळी विक्रम काळे संजय बनसोडे यांनीही मनोगत व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व उमेदवारांच्या पाठीशी ताकद उभे करण्याची आवाहन केले.

### भाजपाचा विकास...

विरोधक जातीय भांडणे लावण्याचा प्रयत्न करत असल्याची टीका करत निलंगेकर यांनी लातूरकरांना सामाजिक वातावरण बिघडू न देण्याची विनंती केली. सोशल मीडियावर जातीय पोस्ट टाकणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशाराही आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी आज झालेल्या पत्रपरिषदेत दिला.

भाजप शहराध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी यावेळी बोलताना सांगितले की, आज सायंकाळी महाराष्ट्राचे भाजप संघटन प्रमुख ना. चंद्रशेखर बावनकुळे येत असून त्यांच्या उपस्थितीत पक्षाची संघटनात्मक बैठक होणार असून उमेदवारांना मार्गदर्शन करणार आहेत. उद्या प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत शहरातील साळाई मंडपम येथे कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला आहे. तर ७ जानेवारी रोजी मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे प्रचार सभेला संबोधित करणार आहेत. भाजपच्या महानगरपालिकेतील सत्ताकाळातील विकास कामांचा उल्लेख करत कव्हेकर यांनी विरोधकांना लक्ष्य केले. विरोधकांकडे सांगण्यासारखे काहीच नाही. आमदार अमित देशमुख यांनी गेल्या १५ वर्षांच्या आमदारकीत कोणतेही ठोस विकासकामे केले नाही. भाजपवर टीका करण्याऐवजी त्यांनी स्वतःची कामे लातूरकरांना सांगावीत. शहरात बॅनरबाजी करून दिशाभूल करता येणार नाही. काँग्रेसने काय विकास केला किंवा शहरासाठी कोणती योजना आणली, हे बॅनरवर असायला हवे होते; पण जुन्या घोषणा देऊन लातूरकरांची चेष्टा करण्याचा प्रयत्न होत आहे, असा घणाघात त्यांनी केला.

भाजप पूर्ण ताकदीने निवडणूक लढवणार असून सर्व उमेदवार सक्षम आणि उच्चशिक्षित असल्याने शहरातील वातावरण पक्षासाठी पोषक आहे. सर्व पदाधिकारी आणि मंडल अध्यक्ष कामाला लागले असून महानगरपालिका निवडणूक भाजप निश्चित जिंकेल, असा आत्मविश्वास कव्हेकर यांनी व्यक्त केला. भाजपच्या दिग्गज नेत्यांच्या प्रचारामुळे शहरात प्रचाराला वेग येणार आहे.

Printed by, Owned by, Published by & Edited by GANGADHAR ABHANG DIGOLE , Printed by GHONE NARASHINHA PANDURANG, Printed at Magic Publication, Shop No.10, MANAPA SHOPING COMPLEX, GANDHI CHOWK, LATUR, Tq.& Dist. LATUR - 413512 & Published at H.No.255, Shri SAI SCHOOL NEAR, Sona Nagar, Barshi Road, LATUR, DIST- LATUR-413512 Tq.& Dist. PARBHANI - 431401 MAH. Editor : GANGADHAR ABHANG DIGOLE RNINO.MHMAR/25/A1409

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक- गंगाधर अभंग डिगोळे यांचे करीता घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १० मनपा शॉपिंग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय घर नं. २५५, श्री साई स्कूल निअर सोना नगर, बार्शी रोड, लातूर, ता. जि. लातूर . - ४१३५१२, येथे प्रकाशित केले. संपादकः गंगाधर अभंग डिगोळे मो.९४०५२९५२०, ९०२८८४५२३३ RNINO.MHMAR/25/A1409

# पंडितराव धुमाळ यांचा शिवसेनेतील प्रवेश हा निलंगा विधानसभेला निश्चितचं उभारी देणारा : शिवाजीराव माने



दै. अदिती एक्सप्रेस

लातूर - शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांच्या नेतृत्वाखाली आज रोजी निलंगा विधानसभेच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने नुकतेच शिवसेनेत प्रवेश केलेल्या पंडितराव धुमाळ व त्यांचे सहकारी यांचा भव्य सत्कार निलंगा येथे आयोजित करण्यात आला होता, महाराष्ट्रालाच नाही तर संपूर्ण देशाला दिशा देणारं नेतृत्व एकनाथराव शिंदे साहेब यांच्या रूपाने महाराष्ट्राला मिळालेलं एक खंबीर नेतृत्व असुन माजी जि प अध्यक्ष पंडितराव धुमाळ व त्यांच्या सहकार्याने केलेला पक्षप्रवेश हा निलंगा विधानसभेला निश्चितच उभारी देणारा असल्याचे प्रतिपादन शिवसेना जिल्हाप्रमुख मा शिवाजीराव माने यांनी यावेळी बोलतांना केले.

पुढे बोलतांना मा जिल्हाप्रमुख माने यांनी अनेक प्रवेश लातूर जिल्ह्यामध्ये होणार असून निलंगा, देवणी, शिरूर अनंतपाळ या तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात इतर पक्षांची असंख्य कार्यकर्ते शिवसेनेमध्ये येण्यासाठी इच्छुक आहेत ,भविष्यात अनेकांचे प्रवेश होणार असून एकनाथ शिंदे साहेबांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून कर्तुत्वाचा उमटलेला ठसा हा प्रेरणादायी आहे ,निलंगा विधानसभा हा एक शिवसेनेचा मजबूत किल्ला बनवण्यासाठी प्रवेश केलेल्या सर्व लोकांनी तसेच शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समितीमध्ये स्वतः ला झोकून देऊन काम करावं एकनाथ शिंदे साहेब यांचे नेतृत्व हे ग्रामीण भागात रुजलेलं आहे आम्ही एकनाथ शिंदे साहेबांच्या पाठीमागे खंबीरपणानं उभं आहोत हे निवडणुकीच्या निकालातून दाखवून द्यावं तसेच होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समितीमध्ये शिवसेनेचे मुख्य नेते सन्माननीय एकनाथराव शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार युतीच्या बाबत निर्णय घेतला जाईल या आदेशाप्रमाणे निवडणुका लढवल्या जातील परंतु निलंगा, देवणी व शिरूर अनंतपाळ या तिन्ही तालुक्यांमध्ये जिल्हा परिषद पंचायत समिती साठी शिवसेनेने ताकतीन उभे राहावं असे आवहानही जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांनी केले.

यावेळी पंडितराव धुमाळ मार्गदर्शनात संजय बिरादार,उल्हास सूर्यवंशी, महेश चव्हाण आदींचा शिवसेनेत प्रवेश केल्याबद्दल सत्कार करण्यात आला ,या सत्काराला उत्तर देतांना पंडितराव धुमाळ म्हणाले की,होय मी निश्चित एक चांगलं व्यासपीठ ,एक चांगला नेता ज्या नेतृत्वात मला काम करण्याचं इच्छा होते असं नेतृत्व मला एकनाथराव शिंदे साहेबांच्या रूपाने दिसलं म्हणून मी शिवसेनेत प्रवेश केलेलो असुन भविष्यात माझं राजकीय संपूर्ण जीवन शिवसेनेच्या सोबतच घालविन, माझ्यासोबत आलेले सर्व सहकारी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांच्या आदेशाचे पालन करून शिवसेना पक्ष वाढीसाठी निश्चित प्रयत्न करू ,आणखीन बरेचसे लोक शिवसेनेत प्रवेश करणार आहेत या सर्वांना सोबत घेऊन मी एकनाथ शिंदे साहेब व जिल्हाप्रमुख मा शिवाजीराव माने साहेबांच्या नेतृत्वात काम करीत राहीन अशी ग्वाही याप्रसंगी शेवटी दिली..

याप्रसंगी निलंगा विधानसभा प्रमुख सोमनाथ स्वामी डिगोळकर ,बालाजी माने, शिरूर अनंतपाळ तालुकाप्रमुख विकास शिंदे, देवणी तालुकाप्रमुख धनराज बिरादार, साहित्यिक गोविंदराव श्रीमंगल , मुरलीधर शिंदे ,भास्कर कुलकर्णी, युवासेना जिल्हा उपप्रमुख राहुल बिरादार ,देवणी तालुका संघटक विष्णू बिरादार, शिरूर अनंतपाळ शहर प्रमुख विनोद धुमाळे, देवणी शहर प्रमुख श्रीमान कांबळे, गणेश माने ,महिला आघाडी मागासवर्गीय सेलचा जिल्हा संघटिका सरोजा गायकवाड ,महिला आघाडी उपजिल्हा संघटिका रेखाताई पुजारी ,तालुकाप्रमुख दैवता सगर ,देवणी तालुका प्रमुख कुंडगीरताई, शिरूर अ. महिला आघाडी तालुका प्रमुख वर्षाताई शिंदे, शि अ युवा सेनाप्रमुख धनराज माने,बबीताताई कोरके, कल्पनाताई स्वामी ,खंडू मनाळे ,व्यंकट आयतनबोने, बालाजी मोहिते, यासह असंख्य शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सावित्रीबाई फुले स्त्री शिक्षणाच्या विरांगणा-शाहीर अपेक्षा डाके

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर (प्रतिनिधी ): ज्या काळात स्त्रीला समाजात मानाचे स्थान मिळत नव्हते, शिक्षणापासून आणि स्वातंत्र्यापासून स्त्रीला दूर ठेवले जात होते,परावलंबित्वाचे आणि गुलामीचे जीवन हाच आपला दागिना समजून ज्या काळात स्त्रिया जगत होत्या अशा समाजविघातक व जाचक रूढी परंपरांना विरोध करून मुलींसाठी शिक्षणाची दारे खुली करून देणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले याच खऱ्या स्त्रियांचा स्वाभिमान जाग्या करणाऱ्या आणि स्त्री शिक्षणासाठी त्याग आणि समर्पण करणाऱ्या विरांगणा होत्या असे मत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध शाहीर, 'आम्ही जिजाऊच्या लेकी' फेम अपेक्षा डाके यांनी व्यक्त केले. लातूर शहरातील एमआयडीसी परिसरामध्ये असलेल्या जिजामाता विद्यालयात सावित्रीबाई फुले यांची जयंती 'बालिका दिन' म्हणून साजरी करण्यात आलीत्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून त्या बोलत होत्या. पुढे बोलताना त्या असे म्हणाल्या की,सावित्रीबाई फुले यांच्यामुळेच आज स्त्रिया बस कंडक्टर पासून ते विमानाच्या पायलट पर्यंत प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून काम करत आहेत,त्यामुळे आताच्या मुलींनी शिकून स्वावलंबी बनावे असेही त्या म्हणाल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य देविदास कोल्हे हे होते तर मंचावर प्रा.बाबासाहेब सोनवणे, प्रा. दत्तात्रय मुंडे,श्रीमती भाग्यशाली गुडे,श्रीमती वैशाली फुले यांची प्रमुख उपस्थिती होती.शाहीर अपेक्षा डाके यांनी आपल्या शाहिरी कलेतून पोवाड्याद्वारे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलें यांच्या स्मृती प्रकट करून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. बालिका दिनानिमित्त जिजामाता विद्यालयातील सर्व महिला शिक्षकांचा तसेच सावित्रीच्या लेकींचा सन्मान करण्यात आला. कु. सुनीता भोसले या विद्यार्थिनीने 'मी सावित्री बोलतेय' या एकपात्री नाटकाचे सादरीकरण केले. शर्वरी साबळे, श्रेया वाघमारे, पूजा देवकते,वैष्णवी सोनवते,तपस्या कोळी, पंचशीला पोरे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन चरित्रावर आधारित जात्यावरील ओव्यांचे सादरीकरण केले. बालिका दिनानिमित्त विद्यार्थ्यांना बालविवाह निर्मूलनाची शपथ देण्यात आली. प्रास्ताविक प्रा.बाबासाहेब सोनवणे यांनी सूत्रसंचालन श्रीमती वैशाली वाघमारे यांनी तर आभार श्रीमती गंगासागर गुंडेकर यांनी मानले. कार्यक्रमाप्रसंगी विद्यालयातील श्री.गोकुळ मतकंटे,प्रा. संतोष जोहरी राजकुमार शिंदे,शंकर पांचाळ, राजाभाऊ वाघमारे,सुधीर बाळापुरे, चंद्रकांत सूर्यवंशी,अप्पासाहेब देशमुख, बालाजी पवार व अर्जुन कांबळे यांची उपस्थिती होती.

# दयानंद वाणिज्य महाविद्यालयात फ्युएल कंपनीतर्फे 'ए आय विथ पायथॉन' प्रशिक्षण संपन्न

दै. अदिती एक्सप्रेस



लातूर / प्रतिनिधी- दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील बीसीए तृतीय वर्ष तसेच एमसीए प्रथम वर्षातील एकूण १२५ विद्यार्थ्यांसाठी 'ए आय विथ पायथॉन' या विषयावर वीस दिवसीय (१२० तासांचे) प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमाचे आयोजन करिअर गाईडन्स अँड प्लेसमेंट सेलच्या पुढाकाराने फ्युएल कंपनीच्या सहकार्याने करण्यात आले आहे. या कार्यशाळेसाठी फ्युएल कंपनीचे शुभम सोनवणे हे मार्गदर्शक म्हणून लाभले होते त्यांनी विद्यार्थ्यांना ए आय व पायथॉनचे सखोल मार्गदर्शन केले त्याचबरोबर प्रॅक्टिकल घेऊन प्रोजेक्ट तयार करून घेतले, स्किल डेव्हलपमेंट मॉक इंटरव्यू इत्यादी स्किल चे प्रशिक्षण दिले. या कार्यक्रमादरम्यान बीसीए तृतीय व एमसीए प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर होते. यावेळी मंचावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.गणेश लहाने आय क्यू ये सी समन्वयक डॉक्टर बी.टी. चव्हाण.,बीसीए विभाग प्रमुख प्रा. शशिकांत स्वामी, बीबीए विभाग प्रमुख प्रा. डॉ. वैशाली सातपुते, तसेच ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. दगडू शेख उपस्थित होते. कार्यक्रम सुरळीत पार पडण्यासाठी बीसीए विभागातील प्रा. प्रसाद पाटील, प्रा. गीतांजली जोशी, आणि प्रा. ज्योती महावरकर यांनी सहकार्य केले. दयानंद वाणिज्य महाविद्यालय विद्यार्थ्यांना व्यावसायिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी नेहमीच अशा उपक्रमांचे आयोजन करत असते.

# औसा शिक्षक मॅरेथॉनमध्ये बालाजी राठोड प्रथम

दै. अदिती एक्सप्रेस

गणेश परळे

केळगाव - औसा शिक्षक पतसंस्थेच्या वतीने शिक्षकांसाठी प्रथमच आयोजित करण्यात आलेली शिक्षक मॅरेथॉन स्पर्धा आज रविवार, दिनांक ४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी उत्साहात पार पडली. या स्पर्धेत शिवाजी आश्रम शाळा, केळगाव येथील सहशिक्षक बालाजी राठोड यांनी प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले.



या स्पर्धेत प्रथम येण्याचा मान मिळाल्याबद्दल बालाजी राठोड यांचा औसा विधानसभा मतदारसंघाचे मा. आमदार अभिमन्यू पवार यांच्या हस्ते ५००१/- चा धनादेश व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

शिक्षकांच्या शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच त्यांच्यातील स्पर्धात्मक वृत्ती, आरोग्य जागृती आणि सामाजिक बांधिलकी वाढवण्याच्या उद्देशाने औसा शिक्षक पतसंस्थेने हा उपक्रम राबवला. प्रथमच झालेल्या या मॅरेथॉनला शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या यशाबद्दल संस्थाचालक शिवाजीराव भिकाने, मुख्याध्यापक बी.के. बैकरे सहशिक्षक डी.बी. पासमे व सर्व शिक्षक वृंदांनी बालाजी राठोड यांचे अभिनंदन केले आहे.

# श्री गुरु हावगीस्वामी यात्रा महोत्सवानिमित्य नवनिर्वाचित नगरसेवकांचा डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराजांचे हस्ते सत्कार संपन्न




दै. अदिती एक्सप्रेस

मनेश पाटील

उदगीर प्रतिनिधी - श्री गुरु हावगीस्वामी यात्रा महोत्सवानिमित्र नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार डॉ शंभूलिंग शिवाचार्य महाराजांचे हस्ते करण्यात आला.

श्री गुरु हावगीस्वामी यात्रा महोत्सवानिमित्र उदगीर नगर परिषद निवडणूकित निवडूण आलेल्या नगर सेवकांचा सत्कार डॉ.शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांचे हस्ते सत्कार करुन शहराच्या विकासासाठी चागले कार्य करण्यासाठी आशिर्वाद दिला. यावेळी उद्योजक सचिन हुडे,नगर सेवक विजय निटुरे,चंदन पाटील नागराळकर,नागेश अष्टुरे,सौ. भारती सुधिर भोसले, कसबे धीरज , सय्यद इम्रान, बोईनवाड व्यंकटराव, कपाळे गंगाबाई गुरूनाथ, सौ.मणकर्णा मुदाळे, पठाण मंजुरखान, सौ. शिल्पा उप्परबावडे,मनोज पुदाले, मनोज पुदाले, चाऊस उमर, अनिल मुदाळे, शितल नर्सिंग शिंदे, अमरनाथ सुर्यवंशी,ॲड सौ. वर्षा पंकज कांबळे,राजकुमार हुडगे,निकीता अंबरखाने,सौ. सध्या गांजुरे,शेख समिरोद्दीन, मीना कोठारे सौ. गोकर्णा गणेश गायकवाड,बाळासाहेब पाटोदे आदी नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी अन्नदाते डॉ.बाळासाहेब शेषेराव पाटिल व श्रीमती विमल गर्जे यांचा सत्कार करण्यात आला. महाआरती होऊन प्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली यावेळी प्रास्ताविक शि.भ.प. शिवराज नावंदे गुरुजी यांनी तर संचलन व आभार विरभद्र स्वामी सताळकर यांनी केले.

# सैनिकी विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी

दै. अदिती एक्सप्रेस

मनेश पाटील

उदगीर प्रतिनिधी- ज्ञानगिरी कॅम्पस मधील श्री छत्रपती शाहू महाराज सैनिकी विद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी झालेल्या कार्यक्रमात विचारमंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पर्यवेक्षक अरविंद सोनटक्के तर प्रमुख पाहुणे म्हणून लालबहादूर शास्त्री विद्यालयातील विज्ञान विषयाच्या सहशिक्षिका सविता कोरे, प्रा. सीमा मेहत्रे, सौ. उज्वला वडले, विभाग प्रमुख संतोष चामले, विलास शिंदे हे उपस्थित होते.

सर्वप्रथम कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करुन करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुण्या सविता कोरे आपल्या मार्गदर्शनात म्हणाल्या,



भारतातील पहिल्या महिला शिक्षिका , मुख्याध्यापिका म्हणून सावित्रीबाई फुले यांची ओळख संपूर्ण भारतभर आहे. स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या, विद्येची जननी व समस्त स्त्रियांना उजेडाची वाट दाखवणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त मी विनम्र अभिवादन करते. शिक्षणाचे महत्त्व विशद करताना त्यांनी विद्यार्थ्यांना चांगले नियोजन करुन अभ्यास केल्यास यश निश्चितच मिळते, असे सांगितले. अध्यक्षिय समारोपात पर्यवेक्षक अरविंद सोनटक्के म्हणाले, मुलींना शिक्षण मिळवून देण्यात सावित्रीबाई फुले यांचा सिंहाचा वाटा आहे. महात्मा जोतिबा फुले यांच्या कार्यात सावित्रीबाई फुले यांनी सहकार्य केले म्हणून आज महिलांना समाजात मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. उज्वला वडले यांनी केले तर आभार डॉ बालाजी मुस्कावाड यांनी मानले. यावेळी विद्यालयातील सर्वच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुनील महिंद्रकर, सुधीर गायकवाड, गोविंद डिगोळे, नागेश पंगू, विजय कावळे, प्रा. युवराज दहिफळे यांनी सहकार्य केले.

# शाळामहाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वाचू आनंदे, लिहू आनंदे' स्पर्धेचे आयोजन

दै. अदिती एक्सप्रेस

मनेश पाटील

उदगीर प्रतिनिधी - विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती रुजावी, विचारशील लेखनाला चालना मिळावी या उद्देशाने महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर यांच्या वतीने वाचन पंधरवडा व स्कुल कनेक्ट अंतर्गत वाचू आनंदे, लिहू आनंदे या संकल्पनेवर आधारित पुस्तक परीक्षण लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा उदगीर तालुक्यातील शाळा व महाविद्यालयांमधील सर्व माध्यमांच्या, सर्व भाषांच्या व सर्व विषयांतील विद्यार्थ्यांसाठी खुली असून विद्यार्थ्यांना आपली वाचन-लेखन क्षमता सादर करण्याची एक अनोखी संधी उपलब्ध झाली आहे.

या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीचे कोणतेही पुस्तक वाचून त्यावर ४०० ते ५०० शब्दांत स्वतःचे विचार व मत मांडायचे आहेत. लेखन हे स्वतःच्या हस्ताक्षरात असणे बंधनकारक असून इंटरनेटवरील, चॅटजीपीटी किंवा एआय द्वारे तयार केलेले लेखन ग्राह्य धरले जाणार नाही. तसेच विजेत्या विद्यार्थ्यांना लेख सादर करताना संबंधित पुस्तकाची मूळ प्रत दाखवणे आवश्यक आहे.

स्पर्धेसाठी लेख जमा करण्याची अंतिम तारीख १५ जानेवारी २०२६ असून लेख महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या ग्रंथालयात ग्रंथपाल डॉ. लक्ष्मीकांत पेन्सलवार यांच्याकडे जमा करावयाचे आहेत. स्पर्धेचा प्रवेश पूर्णतः मोफत असून ही स्पर्धा सर्व विद्यार्थ्यांसाठी खुली आहे. स्पर्धेत कनिष्ठ (इयत्ता सातवी ते बारावी) व वरिष्ठ (पदवी, पदविका व पदव्युत्तर) असे दोन स्वतंत्र गट ठेवण्यात आले आहेत. दोन्ही गटांसाठी आकर्षक रोख बक्षिसांची घोषणा करण्यात आली आहे. प्रथम क्रमांकासाठी ५१०० रुपये, द्वितीय क्रमांकासाठी २१०० रुपये व तृतीय क्रमांकासाठी ११०० रुपये तसेच स्मृतिचिन्ह देण्यात येणार आहे. बक्षीस वितरण २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहणानंतर सकाळी ९ वाजता महाविद्यालयात होणार आहे. या स्पर्धेच्या बक्षिसांचे प्रायोजकत्व व्यंकटेश्वरा कलेक्शन, मोंढा रोड, उदगीर (तृतीय क्रमांक दोन बक्षिसे), कृष्णा पुस्तकालय, नांदेडबिदर रोड, उदगीर (द्वितीय क्रमांक दोन बक्षिसे), सौ. महानंदाबाई शरणप्पा तोंडारे, उदगीर (वरिष्ठ गट प्रथम क्रमांक ५१०० रुपये) तसेच बालाजी फटाके स्टॉल, नांदेड रोड, उदगीर (कनिष्ठ गट प्रथम क्रमांक ५१०० रुपये) यांच्या वतीने देण्यात येणार आहे. या उपक्रमाचे मीडिया पार्टनर म्हणून 'दैनिक यशवंत' कार्य पाहणार आहे.

वाचा विचार करा आणि शब्दांतून आपली ओळख निर्माण करा या संदेशासह आयोजित केलेली ही स्पर्धा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासह वाचनाची गोडी वाढवणारी ठरेल, असा विश्वास महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर तसेच सर्व कार्यकारणी सदस्य, प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, उपप्राचार्य डॉ. एस. एन. हल्लाळे, ग्रंथपाल डॉ. एल. बी. पेन्सलवार तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी व्यक्त केला आहे.

# इनरव्हील क्लबच्या वतीने झोनल पिकनिक अभिलाषाचे सोलापूर सिंगी फार्म येथे आयोजन

दै. अदिती एक्सप्रेस

पाटील मनेश

उदगीर - समाजकार्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असणारी महिलांची संघटना असणारी इनरव्हील क्लब नेपश ५ वतीने झोनल पिकनिक अभिलाषाचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये सोलापूर सिंगी फार्म येथे हुरडा पार्टीचे करण्यात आली होती.यासाठी पीडीसी व झोनल कोर्डीनेटर रेखा माने यांच्या पुढाकाराने ही पिकनिक नियोजित करण्यात आली यावेळी डिस्ट्रिक्ट ट्रेझरर नेत्रा बक्कड यांची व

प्रमुख अतिथी पीडीसी पद्मजा अय्यंगार यांची विशेष उपस्थिती होती. होस्ट क्लब इनरव्हील क्लब उदगीरच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित केला होता.




कनव्हेनिअर व चार्टर प्रेसिडेंट सौ मीरा चंबुले को -कनव्हिनिअर व इनरव्हील क्लब उदगीरच्या अध्यक्षा सौ पल्लवी मुक्कावार,ट्रेझरर स्वाती गुरुडे, सेक्रेटरी योजना चौधरी,आय एस ओ रोहणी चाटे , जाईंट सेक्रेटरी प्रिया नारखेडे झोनल सब-कोर्डीनेटर मानसी चन्नावार, राजश्री देशमुख, विजयमाला भुसारे यांनी पिकनिकच्या यशस्वीतेसाठी विशेष प्रयत्न केले. याच कार्यक्रमात ऑरेंज द वर्ल्ड अंतर्गत संगीता जाधव योगा टिचर यांनी स्वसुरक्षा यावर अतिशय सुंदर पद्धतीने प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. सदस्यांना देण्यासाठी वेलकमकिटचे प्रोयोजक सौ किरण मुंडकर, सौ कविता डोंगरगे सदस्य इनरव्हील उदगीर होत्या.

इनरव्हील अहमदपूरच्या अध्यक्षा पुजा रेड्डी व सदस्य, इनरव्हील बीडच्या अध्यक्षा भारती मुंदडा व सदस्य, इनरव्हील चाकुरच्या अध्यक्षा सुनंदा हिप्पळे व सदस्य इनरव्हील जालना होरिझोनच्या अध्यक्षा हेमा जैस्वाल व सदस्य इनरव्हील कळंबच्या अध्यक्षा प्रतिभा भवर व सदस्य, इनरव्हील लातुरच्या अध्यक्षा रेश्मा बोरा व सदस्य यांची उपस्थिती होती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रिती दुरुगकर सदस्य इनरव्हील उदगीर यांनी केले.याचबरोबर उदगीर इनरव्हीलचे सदस्य जास्तीत जास्त संख्येने उपस्थित होते व त्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

सर्व सदस्यांनी निसर्ग रम्य ठिकाण , हुरडा व विविध गेम्सची याचा भरभरून आनंद घेतला.

# जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत लोकांच्या मनातले उमेदवार देणार : सहकार मंत्री बाबासाहेब पाटील

दै. अदिती एक्सप्रेस

चाकूर प्रतिनिधी रोहिणा आगामी जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत लोकांनी शिफारस केलेले उमेदवार जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून देणारअसल्याचे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी चाकूर तालुक्यातील रोहिणा येथे केले.

रोहिणा येथे आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रोहिणा जिल्हा परिषद मतदार संघाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी सहकार मंत्री ना . बाबासाहेब पाटील बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवाजीराव काळे, नगराध्यक्ष करीमसाहेब गुळवे, माजी नगराध्यक्ष उषाताई कांबळे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक यशवंतराव जाधव, तालुका कार्याध्यक्ष भानुदासराव पोटे, सरपंच दयानंद सुरवसे, तालुका उपाध्यक्ष गणपतराव कवठे, नंदकुमार पवार, नगरसेवक इलियासभाई सय्यद, विष्णुकांत तिकटे, सिद्धेश्वरआप्पा अंकलकोटे, मिलिंदराव महालिंगे, मधुकरराव मुंडे, गंगाधर अक्कानरू, भुजंगराव केंद्रे, भीष्मनारायण केंद्रे सर के, सिद्धेश्वर आप्पा लोहारे, मनोज पाटील, संदीप शेटे, मच्छिंद्र नागरगोजे, समाधान डोंगरे, ओम केंद्रे, संदीप पांचाळ, सुरज पटणे, धनराज बाचीफळे, अशोक घोरपडे, देवानंद पाटील, लक्ष्मण घुमे, रामकिशन चिंचोले, माडगे सर, व्यंकट कैलवाडे, राजू शिंदे, अशोकराव पाटील, अंतेश्वर पाटील, सूर्यकांत गव्हाणे, बब्रुवान केसाळे आदी मान्यवर उपस्थित होते.




**सहकार मंत्री नामदार पाटील यांचे हात बळकट करण्यासाठी आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांना विजयी करा मच्छिंद्र नागरगोजे आपल्या भागाचे लोकप्रतिनिधी हे राज्याचे सहकार मंत्री आहेत त्यामुळे आपल्याला निधीची कमतरता कधीही भासणार नाही. आपण जर सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या विचाराचा लोकप्रतिनिधी जिल्हा परिषदेत व पंचायत समितीत पाठवला तर त्याला अधिक निधी प्राप्त होईल यासाठी आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांना विजयी करून सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांचे हात बळकट करावे असे आवाहन रोहिणा जिल्हा परिषद मतदार संघाच्या पदाधिकारी व कार्यकर्ते मेळाव्याचे आयोजक मच्छिंद्र नागरगोजे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना केले.**

पुढे बोलताना सहकार मंत्री नामदार पाटील म्हणाले की, गेल्या अनेक दिवसांपासून जिल्हा परिषदेच्या निवडणुकीला रखडल्या होत्या. मात्र आगामी काही दिवसात या निवडणुका जाहीर होणार आहेत. जिल्हा परिषदेच्या निवडणुका म्हणजे स्थानिक प्रश्नावरची निवडणूक असते त्यामुळे स्थानिक प्रश्नावर ज्यांचा अभ्यास आहे किंवा जे लोकात कायम राहणारे आहेत लोकप्रश्न समजून घेऊन सोडवणार आहेत अशाच कार्यकर्त्यांना निवडणुकीत आपण संधी देणार असल्याचे सहकार मंत्री नामदार पाटील म्हणाले. मागील कालखंडात रोहिणा गावातील अनेक प्रश्नांना न्याय देण्याचा प्रयत्न केला असून अजूनही काही प्रश्न राहिले असतील तर येणाऱ्या निवडणुकीच्या नंतर ते सोडवण्याचा प्रयत्न या भागाचा लोकप्रतिनिधी म्हणून करणार असल्याचे सहकार मंत्री नामदार पाटील म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बिलालखा पठाण यांनी केले. या कार्यक्रमास रोहिणा जिल्हा परिषद मतदार संघातील सर्व १८ गावातील शेकडोच्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती.

## अर्चना गुंजाळ-शिंदे यांना पीएच. डी.

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर : येथील दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयातील इंग्रजी विषयाच्या प्राध्यापिका अर्चना गुंजाळ-शिंदे यांना छत्रपती संभाजीनगरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने इंग्रजी विषयातील पीएच. डी. पदवी बहाल केली.

गुंजाळ-शिंदे यांनी बार्शी (जि. सोलापूर) येथील शिवाजी महाविद्यालयातील प्रा. डॉ. अनिल कट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली 'वुमन सबज्युगेशन अँण्ड अमॅनसिपेशन इन द सिलेक्ट वर्क ऑफ बुची इमेचेटा: अ स्टडी' या विषयावर शोधप्रबंध विद्यापीठाला सादर केला होता. त्यानिमित्त त्यांना पीएच. डी. पदवी प्रदान केली. गुंजाळ-शिंदे यांच्या यशाबद्दल मार्गदर्शक डॉ. अनिल कट्टे, डॉ. पांडुरंग शितोळे, डॉ. मुस्तजीब खान, डॉ. रमेश चौगुले, डॉ. समाधान पवार, निवृत्त प्राचार्य बाबासाहेब गुंजाळ, सतीश पवार, रणधीर निंबाळकर, ईश्वरप्रसाद बिदादा आदींनी अभिनंदन केले.




# माधव बेंजरगे राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराने सन्मानित

दै. अदिती एक्सप्रेस

आहिल्यानगर : सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्याच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात हिसामनगर (माटेगडी), ता. देवणी येथील सामाजिक कार्यकर्ते तथा देवणी काँग्रेस कमिटीच्या सोशल मीडियाचे तालुका अध्यक्ष माधव प्रभाकर बेंजरगे यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याची दखल घेऊन राज्यस्तरीय समाजभूषण २०२५ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या सोहळ्यास महाकालभक्त उज्जैन श्रीमहंत डॉ. श्रीकांतदास धुमाळ महाराज, सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री रुचिरा देसाई, आदर्श सरपंच भास्करराव पेरे पाटील तसेच स्त्री जन्माचे स्वागत चळवळीच्या नेत्या डॉ. सुधा कांकरिया यांची प्रमुख उपस्थिती होती. माधव बेंजरगे यांनी केलेल्या युवकांचे संघटन, सामाजिक उपक्रम, जनजागृती तसेच समाजहिताच्या विविध उपक्रमांची दखल घेऊन त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. पुरस्कार स्वीकारताना त्यांनी समाजसेवेची ही प्रेरणा पुढेही अखंड सुरू ठेवण्याचा संकल्प व्यक्त केला. या सन्मानाबद्दल देवणी तालुक्यासह परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, विविध सामाजिक, राजकीय व युवक संघटनांच्या वतीने त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

# प्रा. मंजुषा शिंदे-भांडवलकर यांना पीएच. डी.

दै. अदिती एक्सप्रेस



लातूर : येथील राजर्षी शाहू महाविद्यालयातील प्रा. मंजुषा शिंदे-भांडवलकर यांना छत्रपती संभाजीनगरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने पीएच. डी. पदवी प्रदान केली.

प्रा. शिंदे-भांडवलकर यांनी बार्शी (जि. सोलापूर) येथील शिवाजी महाविद्यालयातील प्रा. डॉ. अनिल कट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली 'आमोस टुटुओला यांच्या निवडक साहित्यकृतींमधील लोकसाहित्याचा अभ्यास' या विषयावर शोधप्रबंध तयार करून विद्यापीठाला सादर केला. त्यांच्या संशोधनात आफ्रिकन साहित्यातील लोकसाहित्य, लोककथा, मिथक व सांस्कृतिक परंपरांचा अभ्यास करण्यात आला. प्रा. शिंदे-भांडवलकर यांना पीएच. डी. मिळाल्यानिमित्त प्रा. डॉ. अनिल कट्टे, डॉ. मुस्तजीब खान, डॉ. रमेश चौगुले, डॉ. पांडुरंग शितोळे, डॉ. समाधान पवार यांनी अभिनंदन केले.

# प्राध्यापकास जातीवाचक शिवीगाळ मारहाण मनसे कार्यकर्त्यांची निर्दोष सुटका

दै. अदिती एक्सप्रेस

चाकूर - चाकूर येथील भाई किशनराव देशमुख महाविद्यालयातील वाणिज्य विभाग प्रमुख प्रा .अशोक पुदाले यांना मनसे कार्यकर्ते अजित घंटेवाड ,परमेश्वर नवरखेले,सरस्वती नवरखेले, विठ्ठलप्रसाद झांबरे, ऋषिकेश भालेराव आणि अजय धनेश्वर यांनी महाविद्यालय परिसरात तोंडाला काळी शाई लावून मारहाण केली तसेच जातीवाचक शिवीगाळ केली म्हणून चाकूर पोलीस स्टेशन येथे ट्रॉसिटी कायद्याखाली गुन्हा २९३/२०१८ दाखल करण्यात आला होता .

या प्रकरणाची सुनावणी जिल्हा व सत्र न्यायालयात झाली .सरकार पक्षातर्फे दोन विभागीय पोलीस अधिकारी , महाविद्यालयाचे प्राचार्य, संस्थेचे पदाधिकारी असे आठ जणांच्या साक्ष नोंदवण्यात आल्या.

पुरावा म्हणून सीसीटीव्ही फुटेज दोषारोप पत्रात होते परंतु सरकार पक्षास आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करता आला नाही .म्हणून लातूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपींची निर्दोष सुटका केली. फिर्यादी प्राध्यापका विरुद्ध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वर्गात गलिच्छ व खालच्या दर्जाचे शब्द वापरतात म्हणून तक्रार केली होती .

याबाबत महाविद्यालयीन प्रशासनाने चौकशी समिती नेमली होती . प्राध्यापका विरोधात चाकूर येथील सामाजिक संघटनांनी निवेदने दिलेली होती. सदर प्रकरणात आरोपी तर्फ अँड उदय गवारे यांनी बाजु मांडली त्यांना अँड एस ए. शेख अँड अभिलाषा गवारे , अँड सुमित खंडागळे,अँड सुनील गायकवाड यांनी मदत केली.

# उमेश पाटील यांचा श्रीराम प्रतिष्ठान वतीने सत्कार

दै. अदिती एक्सप्रेस
गिरीधर गायकवाड

देवणी : सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या तसेच हिंदुत्ववादी विचारांचा पुरस्कार करणाऱ्या देवणी येथील श्रीराम प्रतिष्ठानच्या वतीने येथील प्रसिद्ध उद्योजक व शिक्षणप्रेमी उमेशजी माणिकराव पाटील यांचा सत्कार करण्यात आला. भारत लिबरल एज्युकेशन सोसायटीच्या उदगीर येथील श्री हावगीस्वामी महाविद्यालयाच्या अध्यक्षपदी उमेश पाटील यांची निवड झाल्याबद्दल हा गौरव करण्यात आला.



उमेश पाटील यांनी शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात केलेले कार्य उल्लेखनीय असून त्यांच्या कार्याची दखल घेऊनच त्यांना शिक्षण क्षेत्रात नेतृत्वाची संधी मिळाल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. विविध क्षेत्रांत सक्रिय सहभाग नोंदवत त्यांनी उदगीरच्या उदयगिरी बाबांच्या नगरीत आपले नाव उज्ज्वल केले आहे. तसेच देवणीचे नाव उदगीरच्या शैक्षणिक क्षेत्रात सुवर्णाक्षरांनी नोंदविले असल्याने हा देवणीकरांसाठी अभिमानाचा क्षण असल्याचे प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. या सत्कारप्रसंगी श्रीराम प्रतिष्ठानचे पदाधिकारी स्वप्नील बावगे, बालाजी सूर्यवंशी, रोहित बंडगर, दयानंद शेळके यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सोमनाथपूर येथे सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

## महिला सक्षमीकरण व शिक्षणाच्या विचारांना उजाळा

उदगीर, प्रतिनिधी (पाटील मनेश)- उदगीर तालुक्यातील सोमनाथपूर येथे शनिवार, दि. ३ जानेवारी २०२६ रोजी सत्यशोधक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९५ व्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक व प्रबोधनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. अंगणवाडी क्रमांक १ तसेच संपूर्ण गावात हा जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. बचत गटांच्या महिला मंडळाच्या वतीने आणि भाजपा महिला मोर्चा हाळीहंडरगुळी मंडळाच्या तालुकाध्यक्षा तथा ग्रामपंचायत सदस्या शिवकर्णा अंधारे यांच्या पुढाकाराने कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली. यानंतर उपस्थित मान्यवरांनी सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक, सामाजिक व क्रांतिकारक कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला. यावेळी श्रृष्टी गोविंद अंधारे, सानवी मारोती कांबळे व मानसी मारोती कांबळे यांनी सावित्रीबाई फुले यांचा पारंपरिक पोषाख साकारत जणू अक्षरशः सावित्रीबाई फुले यांचे रूप अवतरले.



या कार्यक्रमास गुडसूर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सी.एच.ओ. डॉ. शिफा कुरेशी, आरोग्य सहाय्यक चेतन स्वामी, आरोग्य कर्मचारी सुभाष राठोड, आरोग्य सेविका मैना वजीरे, मदतनीस मंजुशा मुंडे यांच्यासह महिला मंडळातील सीमा सूर्यवंशी, कुसूम येलमटे, अंगणवाडी शिक्षिका संगीता तोंडारे, शोभा फड, वंदना केंद्रे, मंगल चिलके, सविता चव्हाण, पूजा कुंभार, सुशीलाबाई तेलंगे, शोभा जोगपेटे, चंपाबाई शिरापूरे, शाहू बाजगीरे आदी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

मार्गदर्शन करताना शिवकर्णा अंधारे यांनी सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षणासाठी केलेले अथक प्रयत्न, समाजातील रूढी-परंपराविरोधातील संघर्ष व सामाजिक क्रांतीतील त्यांचे मोलाचे योगदान यावर सविस्तर प्रकाश टाकला. महात्मा ज्योतिराव फुले यांनी लिहिलेल्या तीन पत्रांचा संदर्भ देत त्या पत्रांमधील विचार आजच्या समाजासाठी किती उपयुक्त आहेत, हे त्यांनी स्पष्ट केले. स्त्री-पुरुष समानता, शिक्षणाचा प्रसार आणि सामाजिक अन्यायाविरोधातील लढा हे सावित्रीबाईंचे विचार आजच्या काळातही तितकेच प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्योती सूर्यवंशी यांनी केले, तर आभारप्रदर्शन शिवकर्णा अंधारे यांनी मानले. सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी असे उपक्रम समाजाला योग्य दिशा देणारे व प्रेरणादायी ठरत असल्याची भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली.

# देगाव जि.प. शाळेत बालकाव्य संमेलन उत्साहात



दै. अदिती एक्सप्रेस

देगाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, देगाव येथे विद्यार्थ्यांचे बालकाव्य संमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. साताऱ्यात सुरू असलेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर काव्ययोग काव्य संस्था, पुणे आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, देगाव यांच्या संयुक्त विद्यमाने सावित्रीबाई फुले जयंती व बालिका दिनाचे औचित्य साधून या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. निसर्ग कवी लक्ष्मण शिंदे यांच्या सहकार्यातून हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

या कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी मा. किरणजी केंद्रे (कार्यकारी संपादक, बालभारती पुणे) होते. कार्यक्रमाचे उद्घाटन निसर्ग कवी लक्ष्मण शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी सौ. वसुधा नाईक (बालसाहित्यिक व कवयित्री), ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाद कोंडे, काव्ययोग काव्य संस्थेचे अध्यक्ष योगेश हरणे, शाळेच्या केंद्रप्रमुख साधना गायकवाड, मुख्याध्यापक मधुकर यादव, शिक्षकवर्ग तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या संमेलनात एकूण २६ विद्यार्थ्यांनी विविध विषयांवरील आशयपूर्ण कवितांचे प्रभावी सादरीकरण केले. उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या पाच विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना सन्मानपत्र, पुस्तक व पदक देऊन गौरविण्यात आले. उर्वरित सर्व बालकवींनाही प्रमाणपत्र व पदक देऊन सन्मानित करण्यात आले.

भोर तालुक्यात जिल्हा परिषद शाळेत प्रथमच विद्यार्थ्यांचे कवी संमेलन आयोजित करण्यात आल्याने विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साह दिसून आला. व्यासपीठ मिळाल्याने मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि आत्मविश्वास सर्वांचे लक्ष वेधून घेत होता.

उद्घाटनप्रसंगी लक्ष्मण शिंदे यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना कविता लेखन व सादरीकरणाच्या अधिकाधिक संधी मिळण्यासाठी अशा उपक्रमांची नितांत गरज असल्याचे मत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात किरणजी केंद्रे यांनी ग्रामीण विद्यार्थ्यांच्या लेखनाला बळ देण्यासाठी अशा कवी संमेलने मार्गदर्शक ठरतील, तसेच निवडक कविता किशोर मासिकात प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन दिले. ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाद कोंडे यांनी हा उपक्रम निश्चितच यशस्वी ठरेल, असे मत व्यक्त करून भविष्यात भोर तालुकास्तरीय बाल कवी संमेलन आयोजित करण्याची सूचना मांडली. सौ. वसुधा नाईक यांनी बालकवितांमधील भावविश्व उलगडून सांगितले, तर योगेश हरणे यांनी प्रास्ताविकातून जिल्हास्तरीय बाल कवी संमेलन घेण्याचा मानस व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. विठ्ठल पवार यांनी केले. संपूर्ण नियोजन श्री. महेंद्र सावंत यांनी केले. आभार प्रदर्शन शिक्षक श्री. योगेश पवार यांनी केले. सर्व शिक्षकांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम यशस्वी व प्रेरणादायी ठरला.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची तालुका स्तरीय आढावा बैठक व पक्षप्रवेश संपन्न

दै. अदिती एक्सप्रेस
गिरीधर गायकवाड

देवणी : दिं. ०४ जानेवारी २०२६ रोजी येणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती संदर्भात चर्चा करण्यासाठी देवणी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आढावा बैठक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते आ.धर्माजी सोनकवडे अध्यक्षतेखाली ठिक सकाळी ११:०० वाजता रसिका सभागृहात संपन्न झाली.या अत्यंत महत्त्वाच्या बैठकीत तालुक्यातील तीन जिल्हा परिषद व सहा पंचायत समित्यातील जातीनिहाय समीकरणाची चर्चा करून देवणी तालुका पंचायत समितीवर राष्ट्रवादीचा झेंडा फडकविण्यासाठी काय रणनीती आखावी लागेल या संदर्भात चर्चा करण्यात आली. यावेळी मान्यवरांनी आपल्या मनोगतात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विचार जनसमान्यापर्यंत पोहोचवण्यासाठी व तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष बळकट करण्यासाठी प्रत्येक पदाधिकारी आपली प्रयत्नांची पराकाष्ठा करेल हे अभिवचन दिले.



यावेळी विविध पक्षातील कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर विश्वास ठेवून पक्षात प्रवेश केला. देवणी शहरातील स्वतःच्या ताकदीवर निवडून आलेले अपक्ष उमेदवार अमित सूर्यवंशी,उबेद उंटवाले यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्याबद्दल जाहीर सत्कार करून राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस मनोज कन्नाडे यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या..

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते गजानन भोपणीकर,महाराष्ट्र युवक प्रदेश सरचिटणीस मनोज कन्नाडे ,देवणी नगर पंचायतीचे नगरसेवक डॉ. प्रा.अनिल इंगोले , राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा सरचिटणीस अनिल कांबळे, ,देवणी नगर पंचायतीचे नगरसेवक अमित सुर्यवंशी, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस प्रताप कोयले, तालुका युवक शहराध्यक्ष प्रितम आष्टुरे,कार्याध्यक्ष अजय भोळे, युवक शहर कार्याध्यक्ष रितेश सुर्यवंशी, बोरोळ प्रशालेचे शालेय समिती अध्यक्ष सत्यदेव गरड,ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष दत्ता चाळकापुरे, लक्ष्मणराव बिरादार, लक्ष्मण डोणगावे, मल्हारी भांडे, प्रथमेश हलके, सिताराम माने, राजाराम माने, विठ्ठल बिरादार, वैजनाथ माने,अशोक माने आदींची उपस्थिती होती.